।। असमर्थास समर्थ करणे ।।

# दि डेक्कन मर्चन्टस् को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई

(नोंदणी क्रमांक - १५३५ दिनांक ३०-०८-१९१७)

मुख्य कार्यालय : २१७, राजा राममोहन रॉय मार्ग, गिरगांव, मुंबई-४०० ००४.

## ९७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ९७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १०-०८-२०१४ रोजी सकाळी ठिक ९.३० वाजता प्राचार्य बी.एन.वैद्य सभागृह, दुसरा मजला, राजा शिवाजी विद्यासंकुल (किंग जॉर्ज हायस्कूल) हिंदू कॉलनी, दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४ येथे बँकेचे मा. अध्यक्ष, श्री. काशिनाथ दिनकर मोरे यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

### * सभेपुढील विषय *

१. दिनांक १०/०८/२०१३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून संमत करणे.

२. संचालक मंडळाने सादर केलेला सन २०१३-२०१४ चा अहवाल, वैधानिक लेखा परिक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा तोटा पत्रक तसेच त्यांचा अहवाल वाचून स्वीकृत करणे.

३. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०१३-२०१४ च्या नफा विभागणीस मान्यता देणे.

४. सन २०१४-२०१५ करीता वैधानिक लेखा परिक्षक म्हणून संचालक मंडळाने शिफारस केलेल्या श्री. विजयकुमार गेनभाऊ शिंदे, (प्रो. मे. व्ही.जी. शिंदे अॅन्ड कंपनी), सनदी लेखापाल (पॅनल नं. ७२६७) यांच्या नेमणूकीस मान्यता देणे व त्यांचे मानधन ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे.

५. सन २०१५-२०१६ करीता अंतर्गत हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

६. सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरीता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे व त्यास मान्यता देणे.

७. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे पोटनियम दुरुस्तीस मंजूरी देणे.

८. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची रजा मंजुर करणे.

९. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन,

मुंबई

**शशिकांत ल. अभंग**

दिनांक : २३ - ०७ - २०१४

सरव्यवस्थापक

### * विशेष सूचना *

१. गणसंखेच्या अभावी सभा तहकुब झाल्यास वरील सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी ३० मिनिटांनंतर सकाळी ठिक १०.०० वा. सुरु होईल. अशा तहकुब सभेस गणसंख्या अपूरी असली तरीही अग्रसुचनेत नमूद केलेली सर्व कामे केली जातील.

२. बँकेच्या कामकाजाबद्दल किंवा ९७ व्या वार्षिक अहवालासंबंधी काही माहिती हवी असल्यास वा काही सूचना करावयाच्या असल्यास सभासदांनी मंगळवार, दि. ०५-०८-२०१४ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात सायंकाळी ठिक ४.०० वाजेपर्यंत अपेक्षित तपशीलासह लेखी कळवावे, म्हणजे सभेत त्याबाबत माहिती देता येईल. त्यानंतर आलेल्या पत्रांचा विचार करणे शक्य होणार नाही. तसेच ९६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताची प्रत ज्या सभासदांना हवी असेल त्यांना ती बँकेच्या मुख्य व मध्यवर्ती कार्यालयात प्राप्त होईल.